# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक १५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १३/७/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

विषय क्र. ४९३

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/६/२०२१ ते दि.३०/६/२०२१ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घकव्यका/१३०० दि. २/७/२०२१ चे पत्र.

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. ४९४

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/५/२०२१ ते दि.३१/५/२०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. उआप–४/१३१७ दि.३०/६/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ४९५

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ कार्यालयाचे नियंत्रणाखालील भवानी, बिबवेवाडी, कसबा–विश्रामबागवाडा, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे एप्रिल २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/२१९५ दि. २/७/२०२१ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. ४९६

मा.गणेश ढोरे यांचे दि. ६/७/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ४२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.६० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| बजेटकोड– CE20C352/B5-672<br>प्रभाग क्र. ४२ अ फुरसुंगी येथील स्मशानभूमीत विद्युतदाहीनी बसविणे. | ३० लक्ष | --- |
| बजेटकोड– CE113A128/SJ5-89<br>प्रभाग क्र. ४२ अ मध्ये फुरसुंगी येथे ई-लर्निंग स्कूल उभारणे. | ३० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे –** | | |
| प्रभाग क्र.४२ अ फुरसुंगी- छ. शिवाजी महाराज पुतळा चौक येथे सुशोभिकरण करणे | --- | १५ लक्ष |
| प्रभाग क्र.४२ अ भेकराईनगर- विविध ठिकाणी ओपन जिम साहित्य बसविणे. | -- | १० लक्ष |
| प्रभाग क्र.४२अ भेकराईनगर पी.एम.टी. ई बसडेपो च्या कडेने फुटपाथ करणे व सुशोभीकरण करणे | --- | १५ लक्ष |
| प्रभाग क्र.४२ अ भेकराईनगर येथे सासवड हायवे वरील भेकराईनगर पोलीस चौकी येथे चौक सुशोभिकरण करणे | --- | १० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| प्रभाग क्र.४२ अ गंगानगर आय. बी. एम. भिंती शेजारी बनकर शाळा सिमाभिंती लगत ज्येष्ठ नागरिकांसाठी बैठक व्यवस्था/ वाचनालय उभारणे /ओपन जिम साहित्य बसविणे. | --- | १० लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र. ४९७

मा.अरविंद शिंदे व मा.श्रीमती चाँदबी नदाफ यांचे दि. ७/७/२०२१ चे पत्र.

स्थायी समिती सभा क्र. १७ दि. ६/७/२०२१ विषय क्र. ४६८ त्वर्य अन्वये मान्य ठराव क्र. ५६८ हा पुणे शहराच्या आर्थिक अहिताचा, विकासाचा असमतोल निर्माण करणारा असल्यामुळे सदर ठरावाचा फेरविचार करण्यात यावा व मान्य ठराव क्र. ५६८ अन्वये विषय क्र. ४६८ दप्तरी दाखल करण्यात यावा.

## माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. ४९८

दि. ३/५/२०२१ ते दि. ९/५/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२९७ दि. २/७/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. ४९९

दि. २६/४/२०२१ ते दि. २/५/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ४२ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२९८ दि. २/७/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. ५००

दि. १९/४/२०२१ ते दि. २५/४/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ६० आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२९९ दि. २/७/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र. ५०१

कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत प्रभाग क्र. ३२ अ मधील मॅटर्निटी हॉस्पीटल वारजे येथे जनरेटर, एल.टी.पॅनेल्स्, मोटार पंपसेट पुरविणे, बसविणे व अनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.व्ही.एस. इंजिनिअरिंग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.४२,८३,३५९/- पेक्षा १८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,१२,३५४=३८ अधिक जी.एस.टी. १८% र.रुपये ४,२१,४८२=५३ असे एकूण र.रुपये ३९,३३,८३६=९१ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/३१२ दि.६/७/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ५०२

पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड पावडर पुरविणे (IS 15573:2005/2018 नुसार) (मेक-ग्रासिम/GACL/अर्किल/मे.द आंध्रा शुगर्स प्रा.लि.) कामी टेंडर्स मागविण्यात आली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांनी दिलेल्या दरानुसार अन्य १ ठेकेदारांनी काम करण्यास सहमती दाखविल्याने १) मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन २) मे.केमिकल पीपल, यांचेकडून सदरची खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा. क्र. मआ/पापु/३२० दि.७/७/२०२१ चे पत्र.

१) पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलीॲल्युमिनियम क्लोराईड पावडर पुरविणे (IS 15573:2005/2018 नुसार) (मेक-ग्रासिम/GACL/ अर्किल/मे.द आंध्रा शुगर्स प्रा.लि.) या कामाचे पुर्वगणनपत्रक र.रु. ७२,४०,२००/- (र.रु. ३२,९१० प्रति मे.टन) पैकी मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन व मे.केमिकल पीपल, यांचेकडून रक्कम रु.३३,५६८/- प्रति मे.टन (२% जास्त दराने) सर्व करांसह या दराने अ.क्र.

७०:३० नुसार १५४.०० मे.टन (मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन) व ६६.०० मे.टन (मे.केमिकल पीपल) याप्रमाणे एकूण २२०.०० मे.टन याप्रमाणे पॉलीअॅल्युमिनियम क्लोराईड पावडरसाठी एकूण र.रुपये ७३,८४,९६०/- पर्यंत ब पाकीट उघडलेच्या (दि.२७/५/२०२१) दिनांकापासून पी.ए.सी. पावडर खरेदी करणेस

२) वरील क्र. १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदीसाठी करारनामा करणेस व अनामत रक्कम भरुन घेणेस

३) वरील प्रमाणे खरेदी केलेल्या परिमाणांचे बिल पुरवठादारास अदा करणेस.

४) बजेट कोड क्र. XE12R103 या बजेट हेड वर खर्च टाकणेस

विषय क्र. ५०३

हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभागामध्ये टँकरने पिण्याचे पाणी पुरवठा करणे सन २०२१-२२ (भाग १) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार रवि फुडस अॅन्ड बेव्हरेजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (मान्य पु.ग.प. र.रु. ३९,९९,६००/- पेक्षा ३.६००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३८,५५,६१४=४० चे काम उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/३२१ दि. ७/७/२०२१ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

विषय क्र. ५०४

पुणे पेठ बिबवेवाडी येथील सर्वे नं.६५१ ते ६५७,६२१,६२३,६२७,५५६,६२६,६२० मधील मिळकतीच्या कर आकारणीबाबत मा.अॅड्.अब्दुल गफुर पठाण यांचे दि. २६/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिति ठराव क्र. १७५ दि. २७/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/टॅक्स/१७२ दि.१/६/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ८/६/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५०५

कात्रज कोंढवा रस्ता राजस सोसायटी चौक ते शत्रुंजय मंदिर ते खडी मशीन चौक ते पिसोळी गाव मनपा हद्दीपर्यंत ८४ मी. डी.पी. रस्ता विकसन करणे या कामासाठी पोस्ट टेंडरच्या उर्वरित अॅक्टीव्हिटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजनसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.टी.पी. एफ. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु.१९२,४३,५४,०००/- टेंडर रक्कमेच्या ०.८५% दराने र.रु. १,६३,५७,००९/- पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/२७० दि.२९/६/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ६/७/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५०६

Carrying out O&M Work of katraj-3 & katraj-4 Biomethanation Plant (To Process Segregated Organic Biodegradable Municipal Solid Wastes) having capacity of 10 TPD (5+5) for a Period of 3 Years Installed at Katraj, Pune कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मेलहेम आयकोस प्रा.ली.यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे(टेंडर र.रु.९५,१२,६३०/- पेक्षा ५% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९,८८,२६१=५० सर्व करांसहित पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/२७६ दि. २९/६/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ६/७/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

विषय क्र. ५०७

पुणे महानगरपालिकेच्या कै.शिवशंकर पोटे दवाखानाकरीता खरेदी करण्यात आलेल्य 3.0 Tesla MRI मशिनचे सीएमसी चार्जेस सिमेन्स हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड यांना रक्कम रू.१,२३,३६,९००/- (अक्षरी र.रू. एक कोटी तेवीस लाख छत्तीस हजार नउशे फक्त) अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३०९ दि. ५/७/२०२१ चे पत्र.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.